Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

# स्मृतिस्थळातुन प्रतिबिंबित होणारे महानुभाव पंथीय स्त्री जीवन :- एक चिकित्सक अभ्यास

**शोध निबंध सादरकर्ती : प्रा. सानप मालती अशोक,**
**(एम.ए., बी.एड., एम.फिल., सेट,नेट)**
**इतिहास विभाग,**
**गोखले एज्युकेशन संस्थेचे,**
**एच. पी. टी. कला, व आर. वाय. के.**
**विज्ञान महाविद्यालय, नाशिक.**

***सारांश -***

***स्मृतिस्थळ हा महानुभाव पंथातील एक महत्वपूर्ण चरित्र ग्रंथ होय. चक्रधर स्वामींच्या उत्तरपंथे प्रयाणानंतर इसवी सन १२७२ मध्ये भटोबास उर्फ नागदेवाचार्य पंथाचे प्रथम आचार्य बनले. स्मृतिस्थळ हा भटोबासांचा चरित्रग्रंथ होय. यांच्या कारकिदर्ीत पंथाला भटमार्ग म्हणून संबोधिले जाई. स्मृतिस्थळ हा वाङःमयीन व ऐतिहासिक दृष्या महत्वपूर्ण साधनाग्रंथ ठरतो. महानुभाव पंथातील स्त्रीजीवनावर प्रकाश टाकण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे. स्मृतिस्थळातील विविध स्मृतिंमधून तात्कालिन समाजातील स्त्रियांचे स्थान घसरल्याचे दिसून येते. पंथीय दीक्षा घेऊन संन्यासमार्ग धारण केलेल्या पंथीय स्त्रिया तुलनेत अधिक सन्मानाने जीवन जगल्याचे दिसून येतात. महादाइसा, हिराइसा, आऊसा सारख्या स्त्रिया आचारपालनात अत्यंत कठोर होत्या. तथापि पंथातील इतर स्त्री-पुरुषांच्या आचारपालनावर नियंत्रण ठेऊन प्रसंगी मार्गदर्शनही करत असत. पंथसंवर्धनात पंथीय स्त्रियांचे महत्वपूर्ण योगदान होते. पंथात स्त्रिया अधिक मोकळेपणाने वावरु शकत असत त्यामागे पंथाचा स्त्रिविषयी असलेला उदार दृष्टीकोन असल्याचे दृष्टीक्षेपात येते. स्मृतिस्थळातील विविध स्मृतींवरुन महानुभाव पंथातील तत्कालिन स्त्रीजीवनावर निश्चित प्रकाश टाकता येतो.***

**मुख्य संज्ञा :-** अटन-विजन, आचार, अनुसरण, संन्यास, स्त्रीधन, निरुपण, भिक्षा.

**पूर्वसंशोधनाचा आढावा :-**

महानुभाव पंथाची वाङ्‌मय निर्मिती १३ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत अविरतपणे होत राहिली. इसवी सन १२९४ च्या अल्लाउद्दीनच्या महाराष्ट्रावरील स्वारीनंतर वारंवार मुस्लिम आक्रमणे होत राहिली. या आक्रमणापासून पंथीय पोथ्यांचा बचाव व्हावा व पुढील पिढीसाठी हे साहित्य जतन केले जावे यासाठी सर्व वाङ्‌मय सांकेतिक लिपीत १४ व्या शतकात बंदिस्त केले गेले. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांच्या अथक प्रयत्नानंतर इसवी सन १९१० मध्ये सांकेतिक लिपी उलगडविण्यात त्यांना यश आले. भारत इतिहास संशोधन मंडळाचा इसवी सन १९१० व १९१३ च्या वार्षिकात ती प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर महानुभाव वाङ्‌मय संशोधनाचा विषय बनले. स्मृतिस्थळाचा विचार करता श्री.वा.ना.देशपांडे, डॉ.शं.गो.तुळपुळे, डॉ. व.वि.पारखे यांनी सुरुवातीच्या काळात स्मृतिस्थळाचे संशोधन करुन प्रकाशित केले. त्यानंतर डॉ.रमेश आवलगावकर यांनीही हस्तलिखितांचा शोध घेरुन स्मृतिस्थळात भर टाकली. मात्र या संशोधनात पंथीय वाङ्‌मय, आचार - विचार यावर अधिक भर असून स्तृतिस्थळात आढळणाऱ्या स्त्रियांच्या भूमिकेवर फारसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झाल्याने दिसत नाही. सदर शोधनिबंधातून स्मृतिस्थळातील स्त्रीजीवनाचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पध्दती :-**

सदर शोधनिबंधासाठी मुख्य आधार स्मृतिस्थळ हा चरित्रग्रंथ असल्याकारणाने स्मृतिस्थळातील स्त्रीजीवनाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक अन्वेषण पध्दतीचा वापर केला गेला.

**उद्दिष्टये :-**

१) महानुभाव पंथाचा स्त्रीविषयक दृष्टीकोन अभ्यासणे.

२) महानुभाव पंथाच्या प्रसार व संवर्धनात स्त्रियांच्या योगदानाचा मागोवा घेणे.

३) महानुभाव पंथातील आचारासंबधीत स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

४) समकालीन स्त्रीजीवनाचा अभ्यास करणे.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रात १२ व्या शतकाच्या आसपास अनेक पंथ, संप्रदाय उदयास आले. वारकरी संप्रदाय, नाथपंथ, चोलिका पंथ आदी यामध्ये महानुभाव पंथ हा एक महत्वपूर्ण संप्रदाय होय. श्री. चक्रधर स्वामी यांनी व्दैत विचारसरणीच्या आधारावर महानुभाव पंथाची उभारणी केली. वैदिक धर्मातील कर्मकांड, व्रतवैकल्यास फाटा देऊन भक्ती व ज्ञानावर आधारीत अशी अभिनव विचारसरणी महानुभावपंथाच्या रुपाने समाजासमोर आली. तत्कालिन समाजातील विशिष्ट वर्ण व वर्गाच्याच लोकांना धार्मिक अधिकार प्राप्त झालेले होते. शुद्र व स्त्रियांना अध्यात्मिक अधिकार नाकरला गेलेला होता. अशा परिस्थितीत महानुभाव पंथाचे स्त्रिया व शुद्रांना पंथात संन्यासाचा अधिकार प्राप्त करुन देऊन आध्यात्मिक मार्गाची कवाडे खुली करुन दिली. सनातनी कर्मठ लोकांनी पंथाच्या या कृतीस प्रचंड विरोध केला असला तरी पंथात मोठया प्रमाणावर दु:खी स्त्रिया आणि धार्मिक अधिकार नाकारलेले शुद्र वर्गातील लोक पंथात संन्यास मार्ग स्विकारु लागले. पंथाने स्त्रियांना केवळ संन्यासाचा अधिकार मिळवून दिला असे नव्हे, महानुभाव पंथात स्त्रियांना एक सन्मानाचा दर्जा मिळत असे त्यांच्या कला-गुणांना, वाङ्‌मयानिर्मिती कौशल्यास वाव मिळाला. अनेक स्त्रियांनी पंथात अनुसरल्यानंतर स्वत:च्या कर्तृत्वावर समाजात एक वेगळा दर्जा प्राप्त केला.

महानुभाव पंथाचे महत्वपूर्ण वैशिष्टये म्हणजे त्यांनी केलेली वाङ्‌मयानिर्मिती होय. लीळाचरित्रा सारखा मराठी भाषेतील आदयग्रंथ पंथात लिहिला गेला. याशिवाय अनेक गदय, पदय ग्रंथ रचले गेले. तथापि लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, वृध्दाचार यासारखे ग्रंथ वाङ्‌मयीन दृष्टया तर उच्च दर्जाची आहेत परंतु ऐतिहासिक दृष्टया ही ते महत्वपूर्ण ठरतात. महानुभाव पंथाच्या इतिहासाबरोबरच समकालीन समाजजीवन सांस्कृतिक जीवन आणि राजकिय परिस्थितीवरही प्रकाश टाकण्यासाठी हे ग्रंथ महत्वपूर्ण ठरतात. स्मृतिस्थळ म्हणजे महानुभाव पंथाचे प्रथम आचार्य भटोबास उर्फ नागदेवाचार्य यांचा चरित्रग्रंथ म्हणावयास हरकत नाही. मात्र भटोबास प्रमाणेच पंथातील त्यांच्या सहवासात असणाऱ्या अनेक थोर स्त्री-पुरुषांच्या कार्याच्या माहितीसाठी ही स्मृतिस्थळ फारच उपयुक्त ठरते. स्मृतिस्थळातील विविध स्मृतिंमधून पंथाचा स्त्रीविषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो. पंथातील स्त्रियांनी आचारपालनात बजावलेली भूमिका ही माहिती होते. पंथाच्या संवर्धनात स्त्रियांचा असलेला सहभाग यावरही प्रकाश पडतो. भटोबासांचा कार्यकाळ म्हणजेच १४ वे शतक या काळातील महाराष्ट्रातील स्त्रीजीवनाचा अभ्यास करण्यासाठी देखील स्मृतिस्थळ महत्वपूर्ण ठरते.

**महाराष्ट्रातील तत्कालीन स्त्रीजीवनाचा आढावा :-**

भटोबासांचा कार्यकाळ म्हणजे १४ व्या शतकात महाराष्ट्रातील समाज जीवनात स्त्रीयांचा दर्जा खालवलेला दिसून येतो. कुठल्याही

प्रकारचा स्वातंत्र्यापासून स्त्रिया वंचित होत्या. किंबहुना आत्यांतिक निर्बंध त्यांच्यावर लादले गेलेले होते. अनिष्ट प्रथा,जुनाट समजुती, कल्पना, रुढी यांत स्त्रीजीवन बंदिस्त होते. कुटूंबातील स्त्रीचे स्थान इतके परावलंबी होते की, आपले द्रव्य स्वतःला पाहिजे त्याप्रमाणे कारणी लावण्याइतक्या मोकळेपणाने ती समाजात वावरु शकत नव्हती. स्त्रीचे जीवन पुरुषाधीन असल्याने वाटणीला आलेला वडिलोपार्जित जमिन जुमला असो किंवा स्त्रीधनापैकी इतर काही बाब असो, तीचा विनियोग कोणातरी पुरुषाच्या मध्यस्थीनेच करावा लागे.[१] कुटूंबातील विवाहित स्त्रीला स्वातंत्र्याचा अभाव होता. निर्णयस्वातंत्र्यापासून त्यांना वंचित ठेवले गेले होते. कुंटूबातील वडिलधाऱ्या मंडळींच्या मर्जीविरुध्द स्त्रिया वर्तन करु शकत नव्हत्या. याची असंख्य उदाहरणे स्मृतिस्थळात बघावयास मिळतात. स्मृति क्र. १८८ मधील प्रसंगातील वर्णनानुसार "रमाइसे तिये भटोबासांची सीक्षे : तिंएची माहेरीची रामपुरीए होतिः आणि सासुरींचि वीसादखेडिं होतिः एकु दि भातारें रमाइसाते मारीलें:[२] म्हणजेच रमाइसा हीचे माहेर रामपूर व सासर वीसादखेड होते तिला भटोबासांकडून उपदेश होता तिचा पती मात्र तिला मारहाण करत असे.

विवाहीत स्त्रियांच्या तुलनेत वैधव्य प्राप्त झालेल्या स्त्रियांची स्थिती अधिकच दयनीय होती. अशा स्थितीत सासरी तर स्त्रियांची कुचंबणा व्हायचे मात्र तिच्याजवळ स्त्रीधन नसल्यास वडिल किंवा भावाच्या घरीदेखील तिची दुर्दशा होत असे विधवा स्त्रियांना माहेरचा देखील आधार गमवावा लागत असे. तिला वडिलांच्या किंवा भावाच्या घरात कोणी प्रेमाने विचारणारे नाही आणि जवळ पैसाही नाही अशा विधवेलाच नव्हे तर परित्यक्तेलादेखील दाण्या दुमल्यावाचून होणारे आपल्या मुलांचे हाल पाहवेनासे होऊन. दुसऱ्यांच्या घरी स्वयंपाकपाणी किंवा दळणकांडण करुन पोट भरण्याखेरीज उपाय नव्हता.[३] विधवांचे जीवन अधिक यातनामय बनविण्याऱ्या प्रथाही समाजात जोरकसपणे चालू होत्या. यादव कालखंडातच विधवांचे केशवपण करण्याची प्रथा सुरु झाली. सतीची चालतर महाराष्ट्रात सुरुच होती. स्मृतीस्थळातही राजघराण्यातील स्त्रीच्या सती जाण्याची स्मृतीचे वर्णन आलेले आहे. स्मृती क्र १४९ आणि १५० मध्ये यादव राजा रामदेवाच्या मृत्युनंतर त्याची राणी कामाइसा हिला जबरदस्तीने तिच्या इच्छेविरुसती जावे लागले. स्मृतीत पुढील वर्णन आले आहे. "मग कितीका दिसा रावो निवर्तला : मग तेही तोसेंचि केले : बहुतापरी आदिभावे चुकवीला : परी येणे बळाधिकारुला :[४] ** १४९ ** राजघराण्यातील स्त्रिया देखील अशा प्रथांना बळी पडल्याचे दिसून येते. बहुतेक सर्व विधवा स्त्रिया आपले उर्वरित आयुष्य परमार्थसाधनेत घालवत असत. मनःशुध्दी व इंद्रिय दमन व्हावे म्हणून शेकडो उपास तापास करुन तपाचरणी बनत आणि परमेश्वराकडे लक्ष लावण्यासाठी कथा, किर्तन, पुराणे श्रवणात अधिक काळ घालवत तत्कालीन समाजातील स्त्रिया पुण्यप्राप्तीसाठी व्रताचरणाचा मार्ग अवलंबित एकादशी, अनंतव्रत, गोकुळाश्रमी, नवचडी, शिवलिंगार्चन पर्वणी, गुरुपूजा इ. वैयक्तीक वा कौटूंबिक रित्या पालन केली जाणारी कित्येक कमी जास्त कडक स्वरुपाची व्रते महाराष्ट्रीय समाजात रुढ होती. [५]

**महानुभावपंथाच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनावर दृष्टीक्षेप :-**

महाराष्ट्रातील तत्कालिन समाजातील स्त्रियांची स्थिती पाहता महानुभावपंथाचा स्त्रीयाविषयक दृष्टीकोन अधिक उदार असल्याचा दिसतो. स्मृतिस्थळातील अनेक स्मृतींवरुन पंथात अनेक वैधव्य प्राप्त स्त्रियांना संन्यासमार्ग मोकळा करुन दिल्याचे दिसते. काही विवाहीत स्त्रियांदेखील पंथीयाविचाराने प्रभावित होवून पंथात अनुसरल्याची उदाहरणे आहेत. हिराइसा, आबाइसा, कटक देमाइसा, उंबरी गौराइसा, अशा कितीतरी स्त्रिया पंथात अनुसरल्या. स्मृतिस्थळात दिसून येणाऱ्या नागदेवाचार्य, म्हांइभटर, केशोबास, पंडितबास, कोळालोबा यासारख्या पुरुषांचा स्त्रियांबाबतचा उदार दृष्टीकोन आढळतो. भटमार्गात ज्याप्रमाणे प्रज्ञावान स्त्रिया होत्या, तशाच कमी प्रज्ञेच्या स्त्रियाही असत. अशा स्त्रियांना पंथीय तत्वज्ञानाच्या काही व्याख्या अथवा शब्दांच्या अर्थाचे आकलन होत नसे. अशा स्त्रियांना सविस्तर व सागांपांग विवेचन भटोबास आपल्या निरुपणात करत असत. स्मृती क्र. २०४ मध्ये या प्रसंगाचे वर्णन आलेले आहे. एक वेळ भटोबास म्हणीतले : बाइयांसी काइ

व्याख्या न धरत असे म्हणौनि शब्दशब्दार्थ सवचि घोकवावा:।।[६] यावरुन भटमार्गात सर्व प्रकारच्या स्त्रियांचा विचार केला जाई. कमी प्रज्ञेच्या स्त्रियांनाही योग्य आकलन होण्यासाठी भटोबासांनी केलेला प्रयत्न तत्कालिन समाजाचा विचार करता प्रशंसनीय मानावे लागेल.

लीळाचरित्राचे निर्माते आणि पंथातील षड्शास्त्रसंपन्न विद्वान व्यक्ती म्हणजे म्हांइभट होत. आऊसा या पंथातील जेष्ठ स्त्री साधकांपैकी एक होत. तिला श्रीचक्रधरांपासून अनुसरण होते व सहवासही लाभलेला होता. म्हाइंभटानी आऊसाचा पाहुणचार नाकारल्याचे भटोबांसांना समजताच ते आऊसाचे पंथातील स्थान म्हांदूभटांना स्पष्ट करतात. स्मृती क्र. २३० मध्ये त्याचे विवेचन आले आहे. भटोबांसी म्हणीतले : "आहा म्हाइंभटो जे आउ पूढां पळे आणि गोसावी बुझावया पाठी लागति : आउवेंच नोघिजे अन स्वीकरिलीयावीण गोसावी आरोगण न करीति... ते आउवेंचे नोघिजे:[७] तरि देवांचे नोघिजे म्हणा : तुम्ही चुकलेती : ऐसी आउसांची प्रसंसा केलि: सदर स्मृतिवरुन आऊसासारख्या वृध्दस्त्रीला पंथात आदराचे स्थान होते हे स्पष्ट होते. चक्रधर स्वामींच्या काळातही आऊसा यांस पंथात अत्यंत सन्मानाचा दर्जा असल्याचे भटोबास कथन करतात. म्हांइभटांना स्वत:ची चूक लक्षात येताच ते आउसाकडे जावून साष्टांग दडवंत घालतात व क्षमा मागतात. आपले अनुचित मनातुन काढून टाकण्याची प्रार्थना करतात व आऊसाचा पाहुणचार तृप्त होईपर्यंत घेतात. पंथातील वृध्द स्त्रियांची योग्य ती काळजी व सेवा ही केली जात असल्याची अनेक उदाहरणे स्मृतिस्थळात दिसून येतात. भटोबास महादाइसाच्या अंतसमयी स्वत: त्यांची शुश्रुषा करतात. साधाइसा सारख्या वृध्द स्त्रीला अटन-विजन शक्य नसल्याने तीला निंबा येथे मठ बांधून राहण्याची व्यवस्था करतात आणि स्वत: वारंवार मठास भेट देवून चौकशी करत असल्याचेही वर्णन स्मृतिस्थळात आहे. मुस्लिम आक्रमणांच्या वेळी स्त्रियांच्या संरक्षणाची योग्य तजवीज भटमार्गाने केलेली दिसते.

**महानुभाव पंथीय स्त्रियांची आचारपालनातील भूमिका :-**

महानुभाव पंथात वैराग्य धारण करणाऱ्या स्त्री-पुरुषांसाठी विशिष्ट आचारप्रणाली आहे. अटन आणि विजन हा आचाराचा महत्वाचा भाग होता. याबाबत भटमार्गातील स्त्रिया दक्ष असल्याचे दिसून येते. हिराइसा ही भटोबासांना अनुसरलेली स्त्री वैराग्य पालनात अत्यंत कठोर होती. हिराइसाच्या आचारणाचा व शिस्तीचा दरारा मार्गात असे. अटन-विजनात चुकलेल्या साधकास ती योग्य मार्गदर्शन करत असे. याबाबतच्याही स्मृती स्मृतिस्थळात आल्या आहेत गौराइसा उंबरीकर नामक स्त्री आचार पालनात चुकल्याचे निदर्शनास येताच हिराइसाने तिला शिक्षापण केले. याबाबत भटोबासांनी ऐकल्यावर हिराइसाच्या मार्गाभिमानाबद्दल गौरवोद्गार काढलेली दिसून येतात. महादइसा मार्गातील साधकांच्या अटन-विजनावर फार काळजीपूर्वक लक्ष ठेवत असे. एकदा महादाइसा अटनास गेल्या असता म्हाइंभट्ट विजनास बसले त्या गावी गेल्या तेव्हा म्हाइंभट विजनासाठी बहरलेल्या मळयात बसलेले पाहून त्यांची कानउघाडणी करतात व पंथीय आचारप्रणालीनुसार विजनासाठीची ठिकाणे कोणती आहेत. याबाबत मार्गदर्शन करतात. स्मृती क्र. १६९ मध्ये या गोष्टींचे वर्णन आले आहे. धर्मवार्ताप्रसंगे महादाइसी म्हणितले : ईश्वरविरहया पुरुषांची ये तंव वीजने नव्हति : ये सलागा पुरुषांची वीजने : यैसे धर्मव्दारे महादाइसी दाखवीले : ते म्हाइंभटी मानिले : थोर सुख जाले [८] स्त्रिया स्वत: अत्यंत काटेकोरपणे आचारपालन करत आणि पंथातील महात्मे व स्त्री साधकांनाही आचारपालनासाठी योग्य मार्गदर्शन करत. कटक देमाइसा, नातनागाइसा, लाखाइसा बाभुळगावकर या पंथीय स्त्री साधक कडक वैराग्य धारण केल्याने पंथात अजरामर झाल्या. स्वत:च्या आदर्श आचरणाने पंथात आचारपालनाची एक परंपरा या काळात निर्माण झाल्याचे दिसून येते.

**महानुभाव पंथसंवर्धनात स्त्रियांचे योगदान :-**

स्मृतिस्थळात अशाही स्त्रियांचे दर्शन घडते ज्यांनी पंथसंवर्धनात महत्वाची भूमिका बजावली होती. स्मृती क्रमांक ४ ते ९ यामध्ये महादाइसांनी पंथसंवर्धनात केलेल्या कामगिरीचे वर्णन आले आहे. चक्रधरांच्या उत्तरापंथे प्रयाणानंतर भटोबास विरहाने दु:खी होवून भटकू लागतात. पंथाला सावरण्याची जवाबदारी त्यांच्यावर असतांना ते स्वत:लाच सावरु शकत नव्हते. अशा वेळी महादाइसाने गंगातीरापासून विदर्भापर्यंत त्यांचा शोध घेतला. विविध नगरे, घाट, गिरी-डोंगर, दरडी, टेकडया, वन-उपवने सर्वत्र त्यांना शोधले अखेरीस भानखेडयाच्या

डोंगरात ते निपचित पडले असल्याचे त्यांना दिसते. त्यांना पाटकुळी घेवून त्या गावात आणतात व शुध्दीवर आणतात व त्यांना पंथाच्या जबाबदारी बाबत जाणीव करुन देतात. महादाइसाच्या रुपाने भटोबांसाना नवजीवन मिळाले. पर्यायाने पंथाला नवजीवन प्राप्त झाले. भटोबांसाच्या आचार्यपदी विराजमान झाल्याचीही स्मृती आलेली आहे. " योग्य जाले : घडिलेः मढिलेः आचार्य करुनि मग गोसावियांसी प्रवृत्यंतर जालेः शके ११९४ श्रीमुख संवतसही माहो माझी शुध चतुर्थी सोमवारी[९] साधाइसा सारख्या वृध्द स्त्रीने मुस्लिम आक्रमणाच्या वेळी वैजनाथाच्या देऊळात आश्रयास असलेल्या इतर स्त्री - पुरुष साधकांचे खंबीरपणे रक्षण केले.

पंथात काही स्त्री-पुरुष आपल्या कर्तृत्वाने आचार्यपदी विराजमान झाल्या. चक्रधरस्वामींचे एकनिष्ठ भक्त जनोपाध्याय यांची पुतणी कमळाइसा हिला वैधव्य प्राप्त झाल्यानंतर भटोबासांजवळ अनुसरते जनोपाध्यायाची वृध्दपकाळात शृश्रुषा करते. त्यांच्या निधनानंतर त्या उपाध्ये आम्नायाच्या प्रवर्तक बनल्या. त्यांचे जवळपास ४२ शिष्य होते. त्यात २२ स्त्री साधक होत्या. स्मृतिस्थळात कमलाइसाच्या उपाध्ये आम्नायाच्या प्रमुख प्रवर्तकाबाबत पुढील उल्लेख आढळतो. "कमळाइसे तिर्ये भटोबासाची सीष्ये : पुरुषोत्तमदेवो उपध्यायाची कन्या : आणि जनोपाध्यायाची धुआडी : गुरुकुल तयांते पीत्या चुलत, याचेनी योगे उपाध्ये म्हणतिः तयापासौनी जाला तो उपाधी आमनाएः[१०] ।।

**निष्कर्ष :-**

स्मृतिस्थळातील स्त्रीजीवनाच्या चिकित्सक अभ्यासातुन काही निष्कर्ष काढता येतात. भटोबासांच्या कारकार्दीत महानुभाव पंथाचा स्त्रिविषयक दृष्टीकोन अत्यंत उदार असल्याचा दिसून येतो. पंथीय पुरुष साधकां प्रमाणेच स्त्री साधकांना समानतेची वागणूक मिळत असल्याचे दिसते. यादवकालीन स्त्रीजीवन अत्यंत परावलंबी व अनिष्ट रुढी -परंपरेने बंदिस्त असल्याचे दिसून येते. पंथीय स्त्रिया आचारपालनात अधिक एकनिष्ठ व निग्रही असल्याचे आढळून येते. महादाइसा, कमळाइसा, हिराइसा यासारख्या कर्तृत्वान स्त्रियांना समाजात अत्यंत सन्मानाचे स्थान प्राप्त होते. पंथात स्त्रियांना प्रवेश देतेवेळी भटोबास अत्यंत दक्ष असत. पंथाच्या संवर्धनात आणि पंथविकासात स्त्रियांनी महत्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसून येते. समाजातील इतर स्त्रियांच्या तुलनेत पंथीय स्त्रियांना भटमार्गात आदराचे व सन्मानाचे स्थान असल्याचे दिसते. तत्कालिन समाजात अध्यात्मिक कार्यक्षेत्र विशिष्ट वर्गपुरतेच मर्यादीत होते. अशावेळी पंथाने स्त्रियांना दिलेले अध्यात्मिक अधिकार व जीवन सन्मानाने जगण्याचा अधिकार अधिक महत्वाचा ठरतो.

**संदर्भसुची :-**

१) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन, मुंबई १९६३, पृ. क्र. ११७.
२) डॉ.आवलगावकर रमेश वामन, स्मृतीस्थळ, चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९९, पृ. क्र. २४१.
३) उपरोक्त, पृ. क्र. ११७.
४) देशपांडे वा.ना., स्मृतिस्थळ, व्हीनस प्रकाशन, पुणे २०१२, पृ. क्र. ६५.
५) उपरोक्त, पृ. क्र. १२०.
६) डॉ.आवलगावकर रमेश वामन, स्मृतीस्थळ, चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९९, पृ. क्र. २४९.
७) कित्ता पृ. क्र. २६४.
८) देशपांडे, पारखे, आवलगावकर स्मृतिस्थळ, प्रिन्ट प्रासेस, सातारा मे.२०१२, पृ. क्र. ६७.
९) कित्ता पृ.क्र.१३.
१०) उपरोक्त, पृ.क्र.३४८.